दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २२२ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.८ नोव्हेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## कोम्बिंग कारवाई दरम्यान सराईत गुन्हेगार ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिसांच्या कोम्बिंग कारवाई दरम्यान एका सराईत गुन्हेगारास पनवेल रेल्वेस्टेशन जवळील नवनाथ मंदिर मालधक्का झोपडपट्टी परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे .

आरोपी इजाज शेख उर्फ अज्जू याने त्या परिसरात चहा टपरीवर चहा पिण्याकरिता थांबलेले महादेव देवकांबळे (वय ४५ ) यांच्या कडील ओपो कंपनीचा १२,५०० /- रुपये किमतीचा मोबाईल फोन जबरदस्तीने ओढून चोरून घेऊन गेला होता व चाकूचा धाक दाखविला होता .

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परिसरात कोम्बिंग कारवाई करून आरोपीला ताब्यात घेतले आहे .

# अखेर पुण्यातील जमिनीचा व्यवहार रद्द : ना.अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पुण्यातील कोंढवा जमीन अनियमितता प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर गंभीर आरोप झाल्यानंतर आता हा व्यवहार रद्द करण्यात येणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यातच, उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडील अजित पवारांनी व्यवहारासंदर्भात माहिती दिली. माझ्या माहितीनुसार हा व्यवहार रद्द करण्यात आला आहे. आता, याप्रकरणी चौकशी समिती नेमण्यात आली असून ही समिती संपूर्ण चौकशी करेल, त्या चौकशीत सर्व घटनाक्रम पुढे येईल. कोणी मदत केली, कुणाचे फोन गेले हे सगळं समोर येईल. मात्र, मी नेहमीच माझ्या स्वकीयांना, नातेवाईकांनाही सांगतो, नियमाच्या बाहेर जाऊन केलेलं मला चालणार नाही, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

मी आजपर्यंतच्या राजकीय जीवनात नियम तोडून काम केलेलं नाही. मागे माझ्यावर २००९-१० ला आरोप झाले पण ते सिद्ध झाले नाहीत. त्याच्यात अनियमितता होती, श्वेतपत्रिका काढली हे आपल्याला ज्ञात आहे. अधून मधून कमेंटस करुन टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जातो. या व्यवहारात मला



अजिबात काही माहिती नव्हतं. मला माहिती असतं तर लगेच सांगितलं असतं मला विचारुन व्यवहार झालेला आहे. साहजिकच विरोधक आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न करणार, त्यामध्ये दुमत नाही. मात्र, मला आजच माहिती मिळाली की, याप्रकरणी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे. पुढील १ महिन्याच्या आत ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे.

या व्यवहारात माहिती घेतली, चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरु झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरला होते. मी त्यांच्याशी फोनवर संपर्क साधला. जरी माझ्या घरातल्या जवळच्यांचा विषय असला तरी तुम्ही राज्याचे प्रमुख आहात. जे काही नियमाप्रमाणं करावं लागेल, चौकशी करावी लागेल, समिती नेमायची असेल ते करा माझा त्या गोष्टीला पाठिंबा राहील. आरोपातील वस्तूस्थिती जनतेला कळणं आवश्यक असते. या व्यवहारात रुपया देखील दिला गेला नाही. मोठे आकडे सांगितले गेले, गोष्टी सांगितल्या गेल्या. परंतु, मला आज जे कळालं जो काही व्यवहार झाला होता तो रद्द करण्यात आला आहे, अशी माहिती अजित पवार यांनी दिली.

## नशा येणारे इंजेक्शन विकणाऱ्या तरुणाला अलिबाग पोलिसांकडून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जीममधील अथवा इतर साहसी खेळ खेळणाऱ्या तरुणांना नशा येणारे इंजेक्शन विकणाऱ्या आक्षी साखरमधील एका तरुणाला पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून नशा येणाऱ्या दहाहून अधिक बाटल्या, इंजेक्शन जप्त करण्यात आले आहे. या कारवाईने ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबागमधील साखर आक्षी येथील कोळीवाड्यात एक तरुण मेफेन्टरमाईन गुंगीकारक औषध विकत असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली. पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्यासह त्यांच्या पथकाने गुरुवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. या छाप्यात मेफेन्टरमाईन सल्फेट इंजेक्शनच्या दहा बाटल्या आढळून आल्या. तसेच काही रोकड सापडली. तेथील सूरज मनोज राणे (२९) या तरुणाला ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता, जीममध्ये जाणाऱ्या व इतर साहसी खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना गुंगीकारक औषध बेकायदेशीररित्या विकत असल्याचे स्पष्ट झाले. डॉक्टरांच्या परवानगीशिवाय हा गैरप्रकार तो करीत होता.

सर्व मुद्देमाल जप्त करण्या आला. याप्रकरणी



त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रतिक पाटील करीत आहेत. सूरज राणे हा आरोपी आक्षी साखरमधील रहिवासी आहे. तो गावातील फॅब्रिकेशन आणि वेल्डींगच्या दुकानामध्ये हा गैरधंदा चालवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार त्याच्यावर छापा टाकण्यात आला. सूरज राणे याच्याविरोधात यापूर्वीदेखील हल्ला करणे यासारखे गुन्हे अलिबाग पोलीस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# मातृभूमीच्या 'वंदे मातरम' अमरस्तोत्रातून देशभक्तीचा जागर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वातंत्र्य लढ्यातील सेनानी व शहिदांना वंदन आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' गीतमध्ये अल्पाक्षरत्व, अर्थपूर्णता आणि अर्थसंपन्नता ही तीन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. मातृभूमीचे साक्षात चित्र प्रत्येकाच्या हृदयात करण्याचे सामर्थ्य या गीतामध्ये आहे. हे मातृभूमीचे स्तवन तर आहेच; पण त्याशिवाय त्यामध्ये मातृभूमीच्या कर्तृत्वाचे, तिच्या श्रेष्ठत्वाचे आणि आदरणीय स्वरूपाचे चित्रही रेखाटले आहे. 'वंदे मातरम' हे एक मातृभूमीचे अमरस्तोत्र आहे आणि त्याचा गजर देशभर घुमत असताना पनवेलमध्येही वंदे मातरम गीताचे भव्य स्वरूपात समूहगायन झाले. नविन पनवेल मधील बांठिया विद्यालयाच्या मैदानावर झालेला हा राष्ट्रप्रेमी उत्सव मातृभूमीप्रती अभिमान, एकता आणि देशभक्तीची भावना जागवणारा अविस्मरणीय अनुभव ठरला.


'वंदे मातरम' या राष्ट्रगीताच्या १५० व्या वर्षानिमित्त भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात १५० ठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या अनुषंगाने शुक्रवारी (दि. ०७) महाराष्ट्र प्रदेश आणि उत्तर रायगड भाजपच्यावतीने नविन पनवेल मधील के. ए. बांठिया विद्यालय येथे 'वंदे मातरम' समूह गायन विशेष कार्यक्रम राज्याचे वने मंत्री गणेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने अभिनेते व राष्ट्रविचाराचे प्रसिद्ध व्याख्याते शरद पोंक्षे यांचे प्रमुख वक्ते म्हणून वंदे मातरम गीताची पार्श्वभूमी व महत्व यावर मार्गदर्शन झाले.



यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते वसंत भोईर, श्रीनंद पटवर्धन, सुनील घरत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दिपके बेहेरे, चारुशीला घरत, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जयंत पगडे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, ब्रिजेश पटेल, कामगार आघाडीचे प्रदेश सचिव संजय भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, मनोहर म्हात्रे, बबन मुकादम, रवींद्र भगत, तेजस कांडपिळे, नरेश ठाकूर, समीर ठाकूर, सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका सुशीला घरत, राजेश्री वावेकर, प्रिती जॉर्ज, वृषाली वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, जिल्हा सदस्य जितेंद्र म्हात्रे, ॲड. चेतन जाधव, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, युवा मोर्चाचे नवीन पनवेल अध्यक्ष मयूर कदम, पनवेल अध्यक्ष हिमेश बहिरा, रोहित जगताप, यांच्यासह पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

> 'वंदे मातरम' हे गीत सर्वांच्या अस्मितेचे प्रतीक असून ते भारतीय संस्कृतीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. आज या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली. हे गीत भारतभूमीला दिलेला ठेवा आहे. केंद्र व राज्य सरकारने हे कार्यक्रम करत असताना भाजपनेही त्याच अनुषंगाने व्यापक स्वरूपात कार्यक्रम आयोजित केले आहेत. भारतभूमी बद्दल सर्वांना अभिमान आहे. त्यामुळे वंदे मातरम गीत जनमनापर्यंत आणि पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष कार्यक्रमात विद्यार्थी, संस्था, संघटना, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले, त्याबद्दल मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.
>
> **– कार्यक्रम प्रमुख संयोजक आमदार प्रशांत ठाकूर**

## हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासूनच, दोन आठवड्यांचे कामकाज



**नागपूर । वृत्तसंस्था**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाबाबत सुरू असलेल्या सर्व तर्कवितर्कांना आता पूर्णविराम मिळाला आहे. हिवाळी अधिवेशन येत्या ८ डिसेंबरपासून सुरू होऊन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. नागपूर विधानभवन सचिवालयाचे कामकाज २८ नोव्हेंबरपासून नागपुरात सुरू होईल.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ठेकेदारांकडून अधिवेशनाच्या तयारीची कामे बंद केल्याच्या पार्श्वभूमीवर, यंदा सत्र मुंबईतच होईल अशी चर्चा रंगली होती. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सत्रात आठ ते दहा दिवसांचा विलंब होऊ शकतो, असे सूचक वक्तव्य केल्याने या चर्चांना अधिक वेग आला होता.

मात्र, विधानभवन सचिवालयाने शुक्रवारी नागपूर विधानभवनातील कक्ष अधिकारी कैलाश पाझारे आणि स्नेहलता खोब्रागडे यांना पत्र पाठवून स्पष्ट केले की, सत्र ८ डिसेंबरलाच सुरू होईल. पत्रात विधानभवनातील पीठासीन अधिकारी आणि इतर अधिकारी यांच्या कक्ष व निवास व्यवस्थेची तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, २६ नोव्हेंबरपासून मुंबईहून साहित्याचे आगमन सुरू होईल, तर अधिकारी व कर्मचारी २७ नोव्हेंबरपर्यंत नागपुरात पोहोचतील अशी शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनाचा कार्यक्रम १९ डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आला असून, सत्राचे दिवस वाढण्याची कोणतीही शक्यता नाही. दोन आठवड्यांच्या या सत्रात एकूण १० दिवसांचे कामकाज प्रस्तावित आहे. सत्राच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकार पूरक मागण्या सादर करणार आहे, तर १० डिसेंबरला त्यावर चर्चा आणि मतदान होईल. त्यानंतर पूरक मागण्या मंजूर केल्या जातील.

## पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून बांबू लागवडीस सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. पनवेल महानगरपालिकेच्या उद्यान विभागाकडून २ हजार बांबू लागवड करण्यात येणार आहे. उपायुक्त (उद्यान) नानासाहेब कामठे यांच्यामार्फत प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

महाराष्ट्र बांबू धोरण २०२५, राष्ट्रीय बांबू मिशन (छइच्) तसेच महानगरपालिकेतर्फे विविध वृक्षांचे वृक्षारोपण अंतर्गत कळंबोली एन्ट्री पॉईंट ( शिवसेना शाखा) ते केएलई कॉलेज पर्यंत मुख्य रस्त्याच्या बाजूला २ हजार बांबूची लागवड करणे नियोजित आहे. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. गुरूवारी प्रतिकात्मक काही बांबू झाडांचे रोपण करून या वृक्षारोपण कार्यक्रमाचा सुरूवात करण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या अंतर्गत बुध्दा बेली या प्रजातीच्या २ हजार बांबूच्या रोपांची लागवड करण्यात येणार आहे. हरित पनवेल समृद्ध पनवेल बनविण्याच्यादृष्टीने उद्यान विभागाच्यावतीने बांबू रोपणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.या कार्यक्रमास उद्यान पर्यवेक्षक विशाल हुडेकर, सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक महेश घोडसरे, सुमित बोडके यांचे या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.



## जेएनपीएच्या ई-स्पीडबोट सेवेच्या ट्रायलरनला सुरुवात

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीएची मुंबईशी जोडणारी मागील दहा महिन्यांपासून मुहूर्ताच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणारी ई-स्पीड सेवेच्या रनट्रायलला आज ७ नोव्हेंबर पासून सुरूवात झाली आहे.त्यामुळे येत्या दोन-चार दिवसात जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक सुरू होऊन तासाचा प्रवास ३५-४० मिनिटातच होणार आहे. उरण-नेरुळ रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूकीला सुरूवात झाल्यानंतर जेएनपीए-मुंबई सागरी मार्गावरील प्रवासी संख्या मोठ्या प्रमाणावर घसरली आहे.

त्यामुळे जेएनपीएला जेएनपीए-मुंबई या सागरी प्रवासी मार्गावरील बोट सेवेचा खर्च परवडेनासा झाल्याने आणि प्रवासी वाहतूकसाठी वापरण्यात येणाऱ्या जुनाट लाकडी बोटी खार्चिक व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनही उपयुक्त नसल्याने जेएनपीएने ई-स्पीड बोटीचा पर्याय निवडला आहे. प्रदुषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी सुविधांनी सुसज्ज असलेल्या दोन ई-स्पीडबोटींचे कंत्राट माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीला बोटी पुरवठा व हाताळणीचे काम देण्यात आले आहे.दहा वर्षे ई-स्पीडबोटींची सेवा पुरवण्यासाठी जेएनपीएने ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० रुपये खर्चाची तरतूदही केली आहे.

उन्हाळी हंगामात २०-२५ प्रवासी व पावसाळी हंगामात १०-१२ क्षमतेच्या दोन स्पीडबोट बोटी फेब्रुवारी २०२५ पासुनच प्रवासी वाहतूकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार होत्या.मात्र स्पीडबोटींचा वेग, प्रवासी वाहतूकीची क्षमता, तांत्रिक अडचणींमुळे मागील दहा महिन्यांपासून ई-स्पीडबोट सेवा सुरूच झालेली नाही .यामुळे प्रवासीवर्गातुन नाराजी व्यक्त करीत टीका केली जात आहे.

दरम्यान तांत्रिक अडचणी दूर करुन माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीने ७ नोव्हेंबर पासून ई-स्पीड सेवेच्या ट्रायल रनला सुरुवात केली असल्याची माहिती माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीचे एचआर निरज यांनी दिली.दरम्यान ट्रायल रनही दोन दिवस घेण्यात येणार आहे.

त्यानंतरच प्रवासी वाहतूकीला सुरूवात केली जाणार असल्याचेही निरज यांनी सांगितले.तर ई-स्पीड बोटीची ट्रायल रन आजपासून सुरू करण्यात आली असल्याच्या माहितीला जेएनपीएचे उपसरंक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दुजोरा दिला.मात्र प्रवासी वाहतूक करण्यासाठी आवश्यक सुरक्षितता,स्पीड, बॅटरी चार्जिंग आणि ई-स्पीड बोटींच्या कामगिरीबाबत समाधान केले जात नाही तोपर्यंत ई-स्पीडबोट प्रवासी वाहतूकीला परवानगी दिली जाणार नसल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

सागरी ई- स्पीडबोट सेवा बंदरात कामकाजासाठी मुंबईतुन ये-जा करणाऱ्या जेएनपीएचे कामगार, प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ आणि फॅमिली मेंबर्स, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे वेळही वाचण्यास मदत होणार आहे.मात्र फेब्रुवारीमध्ये सुरू होणारी ई-स्पीड बोटसेवा दहा महिने उलटून गेले गेल्यानंतरही अद्यापही सुरू झालेली नाही.यामुळे प्रतिक्षेत असलेल्या प्रवाशांचा भ्रमनिरास झाला आहे.



# श्रीवर्धन येथील कुळकर्णी हॉलमध्ये, वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सामुहिक गायन

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

शासकीय तंत्रनिकेतन व कौशल्य विकास विभागाच्या वतीने श्रीवर्धन शहरातील कुळकर्णी हॉल या ठिकाणी वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल वंदे मातरमचे सामूहिक गायन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जवळजवळ ५०० विद्यार्थ्यांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. श्रीवर्धन येथील र. ना. राऊत विद्यालयाचे विद्यार्थी, गोखले एज्युकेशन सोसायटीच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे विद्यार्थी, तसेच तंत्रनिकेतनचे विद्यार्थी, सदर सामूहिक वंदे मातरम गायन कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तंत्रनिकेतनचे प्राचार्य उपासनी सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी भाजपचे राज्य परिषद सदस्य मनोज गोगटे, पत्रकार संतोष चौकर,अपर्णा बंदरकर, साहित्यिक अनिता कांबळे, विप्राली पुसाळकर, राजे सर तर प्रमुख वक्ते म्हणून एड. संजीव डेगवेकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी ॲड. डेगवेकर यांनी वंदे मातरम या गीताबद्दल आपले मनोगत अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने सादर केले. १८७५ साली बंगाली साहित्यिक बंकींमचंद्र चटोपाध्याय यांनी वंदे मातरम हे गीत लिहिले. हे गीत अत्यंत कमी वेळात त्यांनी लिहिले होते. या गीतामध्ये



जवळजवळ ८०% वाक्यरचना ही संस्कृत भाषेतील आहे तर २० टक्के वाक्यरचना बंगाली भाषेतील आहे.

बंकिमचंद्र चटोपाध्याय यांच्या आनंदमठ या कादंबरी मध्ये या गाण्याचा उल्लेख आहे. तर याच कादंबरीवरून १९५२ साली आनंदमठ हा चित्रपट निर्माण करण्यात आला होता. यामध्ये पृथ्वीराज कपूर, गीता बाली, प्रदीप,अजित यांच्या प्रमुख भूमिका होत्या. तर हेमंत कुमार यांनी या सिनेमाची गाणी स्वरबद्ध केली होती. त्यातील वंदे मातरम हे गीत भारतरत्न, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी गायले होते. या गीताबद्दल माहिती सांगत असताना डेगवेकर यांनी संपूर्ण गीताचे अर्थ उपस्थितांना सांगितले. आपण आपल्या मातृभूमीला वंदन करतो. तसेच आपल्या मातृभूमी वरती वाहणाऱ्या नद्यांमुळे या ठिकाणचा प्रदेश हा हिरवागार व समृद्ध आहे.

या भारत भूमीवरून वाहणारे वारे सुद्धा अतिशय शीतल असे वाहत असतात. जर आपल्या मातृभूमीवर कोणीही हल्ला करण्याचा प्रयत्न केला, तर तो परतून लावण्यासाठी हातात शस्त्र घेण्याची ताकद देखील या मातृभूमीवर राहणाऱ्या जनते मध्ये आहे. आपण सर्वसाधारण या गाण्याचे पहिलेच कडवे म्हण–तो किंवा बहुतेकांना पहिलेच कडवे माहिती आहे. परंतु हे वंदे मातरम पूर्ण गाणे देखील पुढच्या पिढीला शिकवणे अत्यंत गरजेचे आहे. कारण या गाण्याचे शब्द कानावर पडताच आपल्यामध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागृत होते. यावेळी राज्यस्तरीय क्रीडापटू स्वरा गुरव हिचा देखील सत्कार करण्यात आला.

तर शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निबंध व चित्रकला स्पर्धेत भाग घेतला होता. त्यामध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी तंत्रनिकेतन विद्यालयातील एका शिक्षिकेने भारत मातेची आरती देखील सादर केली. त्यानंतर वंदे मातरम या विषयावरती एक लघु नाटिका देखील सादर करण्यात आली. ही नाटिका दर्पण जाधव,सिद्धांत भगत, सिद्धांत वाणी,सार्थक करंजकर, शिवम वाणी,अथर्व भोईर,अनिरुद्ध चौले, ओम तबीब आणि स्नेहा चौकर यांनी सादर केली.

# स्वत:वर प्रेम करा : महेंद्रशेठ घरत




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल नगरीत सुंदर राजीव गांधी मैदानाची निर्मिती करण्यात आली आहे. अतिशय स्वच्छ आणि सुंदर मैदान विलोभनीय आहे. त्यासाठी रामशेठ ठाकूर यांचे योगदान मोठे आहे. क्रिकेटवर माझे विशेष प्रेम आहे. मी आजही वेळ मिळेल तसा न चुकता क्रिकेट खेळतो, ट्रेकिंग करतो. अनेक गावांना सिडकोकडून मी मैदाने मिळवून दिलीत. कुठल्याही सत्तेत नसतानाही. त्यामुळे सत्तेवर असणारी मंडळींनी किमान गावोगावी मैदाने तरी मिळवून दिली पाहिजेत, नाही तर सत्तेत बसून उपयोग काय? स्वतःवर प्रेम करा, निरोगी शरीर हीच खरी संपत्ती आहे, सर्वांशी प्रेमाने वागा, कुणाशी दुष्मणी नको, हा जन्म पुन्हा नाही, हे कायम लक्षात ठेवा, असे मत महेंद्रशेठ घरत यांनी पनवेल येथे व्यक्त केले. टीआयपीएल रोटरी प्रीमियर लिगच्या पाचव्या पर्वाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी रोटरी प्रीमियर लिगच्या पाचव्या पर्वाचे पनवेलच्या राजीव गांधी मैदानावर आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि उद्योजक परेश ठाकूर यांच्या हस्ते शानदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी टीआयपीएलचे डायरेक्टर आणि पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते, उद्योजक परेश ठाकूर, प्रीतम म्हात्रे उपस्थित होते. यावेळी प्रीतम म्हात्रे म्हणाले, महेंद्रशेठ घरत हे रोखठोक बोलतात, त्यांच्यात अनेक गुण आहेत. त्यामुळे त्यांचे विचार मोलाचे आहेत. ते अनुभवाचे बोल आहेत. त्यांनी अनेक गावांना मैदाने मिळवून दिलीत, हे खरोखरच अभिमास्पद आहे.

यावेळी परेश ठाकूर म्हणाले, पनवेल महापालिकेचे स्वतःचे मैदान आणि या मैदानावर पहिल्यांदाच रोटरीच्या क्रिकेट स्पर्धा, हा योग मला मनापासून आनंद देणारा आणि अविस्मरणीय आहे. क्रिकेट स्पर्धांसाठी मैदानातील जय्यत तयारी कौतुकास्पद आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे सहा ओनर, सहा टिम आणि प्रत्येकी १४ खेळाडू आहेत. ही स्पर्धा ७ ते ९ आणि १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. रायगड वारियर्सचे अध्यक्ष गणेश कडू, सचिव डॉ. संतोष जाधव, खजिनदार आशीष थोरात यांच्या पुढाकाराने स्पर्धा सुरू आहेत. तसेच पंकज पाटील, सिकंदर पाटील, सतीश देवकर, देवेंद्र चौधरी यांची स्पर्धा आयोजित करण्यात मोलाची भूमिका आहे.


## ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड

**जाहीर निविदा सूचना**

**दरपत्रक सूचना क्र.१/२०२५-२०२६ दि.१०/११/०२०२५**

ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल जि.रायगड यांचेकडून मान्यताप्राप्त अधिकृत पुरवठाधारकांकडून दरपत्रक सूचना क्र.१/२०२५-२०२६ नुसार खाली नमूद केल्याप्रमाणे **साहित्य व सेवा पुरवठा** करण्याकरिता सीलबंद लिफाफा मध्ये निविदा दरपत्रके मागविण्यात येत आहेत. निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक वार सोमवार दि.१७/११/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. सदर निविदा कोणत्याही कारणाशिवाय मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | तरतूद रक्कम | निधीचा स्त्रोत | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.प.शिवकर हद्दीतील निराधार महिला व परीतक्त्या महिलाना उपजीविकेसाठी साहित्य पुरविणे. | २०००० | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| २ | शिवकर नळ पाणी पुरवठा योजना साठी साहित्य खरेदी करणे. | २६३२८७.५० | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| ३ | ग्रा.प.कार्यालय शिवकर सुशोभिकरण करणे व अभिलेख देखभाल दुरुस्ती करणे.(प्रशासकीय खर्च) | ६१७७१ | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| ४ | रा.जि.प. शिवकर शाळा डिजिटल करणे यांचा मागणीप्रमाणे साहित्य पुरवठा करणे व सुशोभिकरण.(बाला पेंटिंग) | १५४४२९ | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| ५ | शिवकर हद्दीतील अंगणवाडी यांच्या मागणीप्रमाणे साहित्य पुरवठा करणे व डिजिटल करणे.(बाला पेंटिंग) | ६१७७१ | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| ६ | ग्रामपंचायत शिवकर येथील बुद्धविहार येथे सोलर बसविणे. | ५०००० | १५ वा वित्त आ | ६ महिने |
| ७ | ग्रामपंचायत हद्दीतील १५% मागासवर्गीय अंतर्गत मागणी प्रमाणे साहित्य देणे. | २००००० | ग्रामनिधी | ६ महिना |
| ८ | ग्रामपंचायत हद्दीतील १५ % मागासवर्गीय कल्याण अंतर्गत बौद्धविहार मध्ये स्टेज,रिलिंग,शिडी, अक्रेलिक नाव व प्रोजेक्टर व साहित्य देणे. | २००००० | ग्रामनिधी | ६ महिना |
| ९ | शिवकर ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्यालागत असणाऱ्या सुरक्षा कंपाऊंड वर लोकोपयोगी समाज प्रबोधन संदेश लिहिणे व डिजिटल पेंटिंग करणे व माझी वसुंधरा संदेश डिजिटल बोर्ड लावणे. | ३००००० | ग्रामनिधी | ६ महिना |
| १० | रा.जि.प.शाळा जुनी इमारतीवरील सोलर प्रकल्प नवीन इमारतीवर स्थलांतरित करणे. | ८०००० | ग्रामनिधी | ६ महिने |
| ११ | ग्रामपंचायत शिवकर हद्दीत गतीरोधक(speed brekar) बसविणे. | १९०००० | ग्रामनिधी | ६ महिने |

* अटी व शर्ती:

१) अर्जदारांना सदर साहित्य व सेवा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तू व सेवांची यादी सह कामाची कोरी निविदा पत्र दि.१०/११/२०२५ ते दि.१७/११/२०२५ पर्यंत (सुट्टीचा दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यलयात उपलब्ध होतील.

२) भरलेला सिलबंद निविदा/ साहित्य खरेदी चे दरपत्रक दि.१७/११/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

३) आलेल्या निविदा/साहित्य खरेदी चे दरपत्रक दि.१८/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता सभासद समिती समक्ष उघडण्यात येईल.

४) निविदा फॉर्म पोस्टाने पाठविली जाणार नाही व दरपत्रके दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या दरपत्रक स्वीकारल्या जाणार नाहीत.

५) नियमाप्रमाणे जि एस टी सह दरपत्रक भरण्यात यावे तसेच सोबत gst नंबर अनिवार्य राहील.

६) अधिकृत पुरवठाधारकांनी निविदा न भरल्यास स्थानिक बाजारातील पुरवठाधारकांचा विचार केला जाईल.

७) पुरवठा आदेशाप्रमाणे मुदतीत पुरवठा न झाल्यास आपला पुरवठा आदेश रद्द समजण्यात येईल.

८) पुरवठा केलेल्या वस्तूंची पाहणी करून व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

९) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.

१०) सदर पुरवठा आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे पुरवठा करण्याचे काम करण्याचे आहे.

११) एक किंवा सर्व निविदा /दरपत्रक नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**सचिन बाळाराम पाटील**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत शिवकर**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**आनंद दत्तात्रेय ढवळे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत शिवकर**
**ता.पनवेल, जि.रायगड**


# आता पोलादपूरकर घरपट्टी वाढीविरोधात एकवटणार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शहरातील नागरिकांना सलग दुसऱ्यावर्षी घरपट्टीवाढीचा तडाखा देणाऱ्या नगरपंचायत पोलादपूरविरोधात आक्रोश मोर्चा करण्यासाठी आता पोलादपूरकर नागरिक एकवटणार असून पोल–दपूरचे शिल्पकार डॉक्टर काका करमरकर यांच्या बाजारपेठेतील श्रीगणेश मंदिरामध्येच विरोधाचा श्रीगणेशा शहराच्या विविध भागातील २५ ग्रामस्थांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सर्वाधिक गाळे असणारे दिलीप साबळे यांनी नगरपंचायतीवर धडक आक्रोश मोर्चा नेण्याचा सल्ला उपस्थितांना दिला.

पोलादपूर नगरपंचायतीतर्फे गेल्यावर्षी घरपट्टीवाढीच्या नोटीसा बजावण्यात आल्यानंतर अनेकांनी हरकती घेतल्या. या हरकतींवर कोणत्याही प्रकारचे उत्तर न देणाऱ्या नगरपंचायतीने यंदा पुन्हा नागरिकांना पूर्वीपेक्षा अधिक घरपट्टी लावण्यासंदर्भात नोटीसा बजावल्या आहेत. यामुळे पोलादपूरकरांनी बाजारपेठेतील श्रीगणेश मंदिरामध्ये तब्बल विविध भागातील सुशिक्षित आणि समाजसेवी व्यक्तींनी पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत उपस्थिती दर्शविली. यामध्ये सर्वश्री दिलीप साबळे, दीपक शेठ, नितीन शेठ, प्रमोद मंडले, अजित घाटे, अमित तलाठी, ओंकार मोहिरे, प्रकाश मांढरे, प्रमोद शेठ, उमेश सवादकर, संतोष जाधव, जगन्नाथ कदम, दर्पण दरेकर, संतोष मोरे, शैलेश पालकर, सुनील भिलारे, जितू वाडीले, रवी तलाठी, अक्षय शिवदे, निलेश सुतार,सुनील दुदूस्कर, रियाज धामणकर, संतोष चिकणे, संदेश सुरेश शेठ, विलास इंगवले आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

याप्रसंगी पोलादपूरकरांनी मागील वर्षी हरकती आणि निवेदनांवर नगरपंचायतीने केलेली कार्यवाही याबाबत कथन करण्याची गरज व्यक्त केली. मागील वाढीव घरपट्टीच्या तुलनेत यंदाची घरपट्टी अधिक असल्याचे निदर्शनास आणून दिल्याने नगरपंचायतीने हरकतींवर काय विचार केला, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. नागरिकांमध्ये झोन चार्ट, विकास आराखडा याबाबत अनभिज्ञता असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून स्क्वेअर मीटरऐवजी स्क्वेअर फूटमध्ये मोजणी करून पूनर्मूल्यांकन करण्याची मागणी नागरिकांनी यावेळी केली आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ घरपट्टीदार दिलीप साबळे यांनी येत्या ११ नोव्हेंबरला पोलादपूर शहरातील श्रीगणेशमंदिरामध्ये पुन्हा एक विचारविनिमय सभा घेऊन नगरपंचायतीवर नागरिकांचा आक्रोश मोर्चा मोठया संख्येने नेण्याचा निर्णय घेण्यात यावा, अशी सूचना केली. याबाबत दर्पण दरेकर आणि सहकारी यांनी आगामी सभा मोठया प्रमाणात पोलादपूरकरांच्या उपस्थितीत होण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यास सुरूवात केली आहे.


## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. राकेश राजाराम खैर २) सौ. रुपाली राकेश खैर दोघे राहणार टाटा नगर, रुम नं. २५, ओमसाई नगर, व्ही.एन. पुरव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२, यांनी मुळ मालक श्री. कमलाकर नामा पाटील राहणार वाघिवली, ता. पनवेल, जि. रायगड, यांना त्यांच्या मालकीची मिळकत पुनर्वसन व पुर्नस्थापना योजनेअंतर्गत संपादित करण्यात आलेली असुन सदरहू संपादनापोटी मिळालेला भुखंड आमचे अशिल यांनी सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरित करुन घेणार आहेत. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणे:-

**नोड पुष्पक, ता. पनवेल जि. रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक | २६ | २८१ | १२० चौ.मी. |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरिल नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवुन तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,
दिनांक : ०७/११/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर १ए,**
**सीबीडी बेलापुर, नवी मुंबई- ४०० ६१४.**



अर्जदारातर्फे वकीलः ॲड. शिल्पा डोमाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११८०/२०२५
नि.नं.६/ड
ने.ता.१०/११/२०२५

श्री. रितेश सतीश कटके व इतर १ — अर्जदार
विरुद्ध
अर्चना सतीश कटके व २ इतर — सामनेवाला

तमाम जनतेस या नोटिशीने कळवण्यात येते कि, अर्जदार क्र. १ हे कै. सतीश शिवाजी कटके यांच्या मुलगा व अर्जदार क्रं २ ही पत्नी असून सामनेवाला क्र. १ ही मयत कै. सतीश शिवाजी कटके यांची मुलगी आहे, सामनेवाला क्र. २ हे मयत कै. सतीश शिवाजी कटके यांची आई आहे व सामनेवाला क्र. ३ ही मयत कै. सतीश शिवाजी कटके यांचे वडील आहे. अर्जदार क्रं. १ हे सामनेवाला क्र. १, २ व ३ यांची अनुक्रमे भाऊ, नातू व नातू आहेत आणि अर्जदार क्रं. २ ही सामनेवाला क्र. १, २ व ३ याची अनुक्रमे आई, सून व सून आहेत. वरील अर्जदार १ व २ यांची वडील व पती कै. सतीश शिवाजी कटके हे दिनांक ०७.१०.२०२२ रोजी मयत झाले आहेत. अशा परिस्थितीमध्ये वरील अर्जदार क्रं. १ व २ हेच कै. सतीश शिवाजी कटके यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. सतीश शिवाजी कटके यांनी त्यांच्या हयातीत त्यांच्या नावे खालील वर्णनाची स्थावर मिळकत विकत घेतली होती व आहे सदर स्थावर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे**

१) ५०% शेअर असलेला फ्लॅट नंबर १०१, विंग सी, पहिला मजला, सील्वर स्टार को.ऑ. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नंबर ५०, ६३, ६४, सेक्टर क्र. १८, कामोठे, नवीमुंबई, तालुका- पनवेल, जिल्हा-रायगड, क्षेत्रफळ ३२.२१४ चौ. मी. कारपेट + १४.५७१ टेरेस चौ. मी.

२) ५०% शेअर असलेला शॉप नंबर ३१, तळ मजला, सील्वर स्टार को.ऑ. हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नंबर ५०, ६३, ६४, सेक्टर क्र.१८, कामोठे, नवीमुंबई, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड, क्षेत्रफळ २५.७९ चौ. मी.

३) ५०% शेअर असलेला फ्लॅट नंबर १०५, विंग डी, पहिला मजला, रॉयल हिल्स, सर्वे नंबर २३ हिस्सा नंबर २, गाव मौजे नऱ्हे, तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली, पुणे यांची कार्याक्षेत्र तील, क्षेत्रफळ ४०.४२ चौ. मी.

४) ५०% शेअर असलेला फ्लॅट नंबर १०४, विंग डी, पहिला मजला, रॉयल हिल्स, सर्वे नंबर २३ हिस्सा नंबर २, गाव मौजे नऱ्हे, तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली, पुणे यांची कार्याक्षेत्र तील, क्षेत्रफळ ४०.४२ चौ. मी.

सोयी करिता यापुढे सदरहु स्थावर मिळकत असे संबोधले आहे.

मयत कै. सतीश शिवाजी कटके ह्यांच्या मृत्यूनंतर सदरहू मिळकतीसंबंधात व्यवस्था, देखभाल आणि पुढील तजवीज करण्याकरिता वरील अर्जदार यांनी कै. सतीश शिवाजी कटके यांचे वारस असल्याचे ठरवून मिळणेकरिता ना. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदारांस त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारसदाखला प्रदान करणेकामी कोणाचीही, कसलीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ना. कोर्टात सदर प्रकरणी दाखल कराव्यात. मुदत संपल्यानंतर घेतलेल्या हरकती विचारात घेतली जाणार नाहीत आणि अर्जदारास त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला दिला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. ०३ माहे ११ सन २०२५ रोजी माझ्या सहीने आणि कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# खोट्या मतदारांचे प्रदर्शन म्हणजे प्रत्येक मतदाराच्या गालावर चपराक : अमित ठाकरे

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबईत मनसेतर्फे 'खोट्या मतदारांचे प्रदर्शन' भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन पक्षाचे युवा नेते अमित ठाकरे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शन पाहिल्यानंतर अमित ठाकरे यांनी मतदार यादीतील घोळाबद्दल तीव्र संताप व्यक्त करत, हे केवळ प्रदर्शन नाही तर प्रत्येक मतदाराच्या गालावर चपराक आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

नवी मुंबईत मतदार याद्यांमधील घोळ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने उघड केल्यानंतर, हे घोळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत म्हणून वाशी येथे 'खोट्या मतदारांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी अमित ठाकरे यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन करून मतदार याद्यांमधील घोळाचा आढावा घेतला. मनसेचे नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांनी अमित ठाकरेंना या घोळाबद्दल संपूर्ण माहिती दिली.

या प्रदर्शनात मनसेने उघड केलेल्या घोळांपैकी पालिका आयुक्तांच्या घराचा पत्ता असलेल्या मतदारांची नवे, शौचालयाच्या पत्त्यावरील मतदाराचे नाव, मृत व्यक्तींची मतदार यादीतील नावे सर्वसामान्यांपुढे मांडण्यात आले. त्याशिवाय गुजराती भाषेत लिहिलेली नावे, घर क्रमांक शून्य असलेली नावे मांडण्यात आली. इतकेच नव्हे तर या प्रदर्शनात एका मतदाराचा पत्ता चक्क मुंबई महापालिका लिहिल्याचे आढळले असून, नवी मुंबईतील एका धार्मिक स्थळावरही मतदारांची नोंद झाल्याचे आढळून आले.

या सर्व प्रकाराचे निरीक्षण केल्यानंतर अमित ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त करत, हे पाहताना वाईट वाटतंय आणि काय बोलायचं हेच समजत नाही. निवडणूक आयोगाला निवडणूक घ्यायची, एवढी घाई का झाली आहे? हेच समजत नाही. हा गोंधळ तातडीने थांबवला पाहिजे. हे केवळ प्रदर्शन नाही तर प्रत्येक खऱ्या मतदारांच्या गालावर चपराक आहे. अशी तीव्र प्रतिक्रिया अमित ठाकरेंनी दिली आहे. पुढे बोलताना त्यांनी, बोगस मतांच्या आधारे सत्ताधारी जिंकून येत आहेत. तब्बल ९६ लाख दुबार मतदार यादीत घुसवले गेले आहेत. मृत व्यक्तींची नावे अजूनही मतदार यादीत आहेत. राज्य आणि केंद्र निवडणूक आयोग एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. म्हणून निवडणूक घाईघाईत लावण्याची काहीही गरज नाही. अजून सहा महिने घेऊन मतदार यादी दुरुस्त करा. अशी मागणीही अमित ठाकरेंकडून यावेळी करण्यात आली.

# पेण पालिका क्रिडागंणावर उसळले राष्ट्रभक्तीचे चैतन्य

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण तहसीलदार कार्यालय आणि आयटीआय शिक्षण संस्था आयोजित वंदे मातरम गीताला १५० वर्ष झाली या दीड शतकातील भारतीय नागरिकांना प्रेरणादायी ठरलेल्या राष्ट्रगीताचा सन्मान आज पेण नगरपालिका मैदानावर ओसंडून वाहत होता.विद्याथी वंदे मातरम्, भारतमाता की जय या जयघोषाने सकाळी ९.३० ते १ वाजेपर्यंत आसमंत दुमदुमून गेले काय विलक्षणता आहे या राष्ट्रगीतात तो हा इतिवृत्तात याची देही याची डोळा पेणकरांनी मन भरून अनुभवला. वंदे मातरम' आणि 'राष्ट्रीयत्व' यांचा संबंध देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यातून आणि राष्ट्रीय अस्मितेच्या निर्मितीमध्ये आहे. 'वंदे मातरम' हे राष्ट्रभक्ती आणि मातृभूमीवरील प्रेमाचे प्रतीक आहे, तर राष्ट्रीयत्व म्हणजे देशाशी जोडलेली ओळख आणि अभिमान. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी आनंदमठ कांदबरीमधे रचलेल्या या कवितेने स्वातंत्र्य लढ्यात स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणा दिली आणि ते परकीय राजवटीविरुद्धच्या प्रतिकाराचे प्रतीक बनले, ज्यामुळे ते राष्ट्रीय अस्मितेचा एक महत्त्वाचा भाग बनले. आज पेण नगरपालिका मैदानावर सुमारे ५००० विद्यार्थ्यांसमवेत देशप्रेमी नागरीक राजकीय क्षेत्रातील नेते मंडळी शासकीय अधिकारी प्राचार्य शिक्षक शासकीय कर्मचारी महिलांच्या उपस्थित वंदे मातरम् राष्ट्रगीत मोठ्या अभिमानाने गाईले

यानंतर आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् ही नाटीका सादर करीत या गितातील प्रत्येक काव्यपंक्ती उलगडा सादरीकरण करीत अखंड भारत राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी उपस्थितांना आवाहन केले.

या कार्यक्रमासाठी प्रांत अधिकारी प्रविण पवार तहसीलदार तानाजी शेजाळ,नायब तहसीलदार तर खासदार धैर्यशील पाटील, नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी उपस्थिती दर्शविली.

आयटीआय प्राचार्य सदाशिव जनार्दन पाटील, मुख्य समन्वयक-श्रीमती प्रीती शिरसाठ - संदानशिव,वरिष्ठ निदेशक- प्रवीण संदानशिव निदेशक :-प्रफुल्ल फड विजय साळवी , प्राजक्ता मोते, वनश्री मेश्राम,नंदकुमार लोंढे, विजय पाटील, श्रीमती आरती घरत, श्रीमती श्रुती साळुंखे नवनाथ कोळी व समस्त शासकीय तांत्रिक विद्यालय पेण कर्मचारी पेण प्रायव्हेटचे प्राचार्य आर.एम. म्हात्रे सार्वजनिक विद्यामंदिरचे प्राचार्य नाईक सर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले.

# विश्वविजेत्या महिला क्रिकेट संघाचा विजय देशातील मुलींसाठी प्रेरणादायी : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**



भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या महिला क्रिकेट संघाचा विजय क्रीडा क्षेत्रात येणाऱ्या अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधना, जेमिमाह रॉड्रिग्ज, राधा यादव यांना प्रत्येकी २ कोटी २५ लाख, तर प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांना २२ लाख ५० हजार आणि सर्व सहकारी यांना प्रत्येकी ११ लाख रुपये व सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा सत्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

आयसीसी महिला विश्वचषक २०२५ मध्ये प्रथमच भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकला असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि सहकाऱ्यांचा वर्षा या शासकीय निवासस्थानी सत्कार केला. गोलंदाजी प्रशिक्षक आविष्कार साळवी, पद्मश्री डायना एडल्जी, नालिस्ट अनिरुद्ध देशपांडे, लॉजिस्टिक सपोर्ट अपर्णा गंभीरराव, ऑपरेशन मॅनेजर मारुफ फजानदार, मिहिर उपाध्याय, पूर्वा काटे, ममता शिरसुल्ला यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. माणिकराव कोकाटे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, प्रधान सचिव संजय खंदारे, आयुक्त शितल तेली, उपसचिव सुनील पांढरे उपस्थित आहेत.

सत्कारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विश्वचषकात भारतीय महिला संघाने पहिल्यांदाच विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. याचा संपूर्ण भारतीयांना अभिमान आहे. या विजयाने भारताचा गौरव वाढवला आहे. सुरुवातीच्या काही पराभवानंतर संघाने केलेली पुनरागमनाची कामगिरी उल्लेखनीय आहे. प्रत्येक खेळाडूने कुठल्या ना कुठल्या सामन्यात निर्णायक भूमिका बजावली. प्रशिक्षक आणि संपूर्ण संघाचे विशेष अभिनंदन करावे लागेल. या संघातील एकजूट आणि संघभावना महत्वाची असून यामुळे विजय मिळविणे शक्य झाले.

स्मृती मानधना सध्या भारतातील आयकॉनिक खेळाडूंमध्ये गणली जाते. तिचा सुरुवातीपासून ते आजपर्यंतचा प्रवास उल्लेखनीय आहे. ती लवकरच दहा हजार धावांचा टप्पा गाठेल. जेमिमाह रॉड्रिग्ज ने ही सेमीफायनलमध्ये अप्रतिम खेळी सादर केली. राधा यादवने संघर्षमय प्रवास करत आपले अस्तित्व निर्माण केले असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी ऑलिम्पिक मध्ये भारतीय महिला संघ विजय मिळवेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघासाठी घेतलेली मेहनत आणि क्रिकेटमधील त्यांची कामगिरी प्रेरणादायी आहे.

क्रिकेटला लोकप्रिय करणाऱ्या जुन्या पिढीतील सर्व खेळाडूंमुळे आज क्रिकेट या उंचीवर पोहोचले आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांचेही अभिनंदन करताना ते महणाले की, महिला क्रिकेटला त्यांनी स्वतंत्र ओळख आणि दर्जा मिळवून दिला आहे.

## ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड

**जाहीर निविदा सूचना**

**दरपत्रक सूचना क्र.२/२०२५-२०२६ दि.१०/११/०२०२५**

ग्रामपंचायत शिवकर, ता.पनवेल जि.रायगड यांचेकडून मान्यताप्राप्त अधिकृत ठेकेदारांकडून दरपत्रक सूचना क्र.२/२०२५-२०२६ नुसार खाली नमूद केल्या प्रमाणे **विकास कामांसाठी** सेवा पुरविण्याकरिता सीलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक वार सोमवार दि.१७/११/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. सदर निविदा कोणत्याही कारणाशिवाय मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | निधीचास्त्रोत | तरतूद रक्कम | इसारा रक्कम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्मशानभूमी संरक्षण भिंत बांधणे. | १५ वा वित्त आ | १९७४६१ | २००० | ६ महिने |
| २ | अंगणवाडी दुरुस्ती व सुशोभीकरण करणे. | १५ वा वित्त आ | ५०००० | ५०० | ६ महिने |
| ३ | ग्रामपंचायत कार्यालय,शाळा, अंगणवाडी रेनवाटर हार्वेस्टिंग करणे. | १५ वा वित्त आ | ९०७५० | १००० | ६ महिने |
| ४ | शासकीय इमारतीना रेनवाटर हार्वेस्टिंग योजना राबविणे. | १५ वा वित्त आ | २००००० | २००० | ६ महिने |
| ५ | शिवकर येथे पांडुरंग ढवळे ते वामन ढवळे पर्यंत भूमिगत गटार व रस्त्ये करणे. | १५ वा वित्त आ | २०३२१५ | २००० | ६ महिने |
| ६ | शिवकर नळ पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आ | २००००० | २००० | ६ महिने |
| ७ | ग्रामपंचायत शिवकर हद्दीतील सार्वजनिक चौक सुशोभिकरण करणे. | १५ वा वित्त आ | १३५३१७ | १५०० | ६ महिने |
| ८ | ग्रामपंचायत शिवकर हद्दीमध्ये सार्वजनिक ठिकाणी माझी वसुंधरा व समाज उपयोगी संदेश लिहणे. | १५ वा वित्त आ | १५४४२९ | १५०० | ६ महिने |
| ९ | शिवकर येथे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणे. | १५ वा वित्त आ | ४१४०५० | ५००० | ६ महिने |
| १० | ग्रामपंचायत शिवकर हद्दीतील घनकचरा प्रकल्प सुशोभिकरण करणे. | १५ वा वित्त आ | ९०७५० | १००० | ६ महिने |
| ११ | ग्रा.प.शिवकर हद्दीत संदीप तुपे ते अनंता ढवळे यांचे घरापर्यंत गटार बांधकाम करणे. | १५ वा वित्त आ | २४०००० | २५०० | ६ महिने |
| १२ | शिवकर ग्रामपंचायत अंतर्गत रामदास तुपे यांचे घरासमोरील चौक सुशोभीकरण करणे. | ग्रामनिधी | २५०००० | २५०० | ६ महिने |
| १३ | शिवकर ग्रामपंचायत अंतर्गत लुम्बिनीनगर चौक सुशोभीकरण करणे. | ग्रामनिधी | २५०००० | २५०० | ६ महिने |
| १४ | रा.जि.प शाळा जुनी इमारत दिमोलिश करणे. | ग्रामनिधी | ४७६२७ | ५०० | ६ महिने |
| १५ | ग्रामपंचायत शिवकर अंतर्गत एक्सप्रेस हायवे ब्रिजला माझी वसुंधरा अंतर्गत देणारे संदेश लिहिणे व डिजिटल करणे. | ग्रामनिधी | २५०००० | २५०० | ६ महिने |
| १६ | घनकचरा प्रकल्प राबविणे. | स्मार्ट ग्राम यो. | ९९५७१८ | १०००० | ६ महिने |

अटी व शर्ती:-

१) अर्जदारांना सदर विकास कामाची कोरी निविदा पत्र दि.१०/११/२०२५ ते दि.१७/११/२०२५ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यलयात उपलब्ध होतील.

२) भरलेली सिलबंद निविदा दि.१७/११/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

३) आलेल्या निविदा दि.१८/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता सभासद समिती समक्ष उघडण्यात येतील.

४) इसारा रक्कम रोखीने अथवा डिमांड ड्राफ्टने स्वीकरण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट ग्रामपंचायत शिवकर यांचे नावे असावा.

५) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

६) निविदा फॉर्म किंमत ना परतावा राहील.

७) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.

८) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.

९) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार राहावे लागेल.

१०) झालेल्या तांत्रिक मुल्यांकन प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

११) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायतीच्या खाली करायचे आहे.

१२) निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.

१३) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१४) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.

१५) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.

१६) शासकीय नियमाप्रमाणे देयकातून शासकीय कपात करण्यात येईल.

१७) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**सचिन बाळाराम पाटील**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत शिवकर**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**आनंद दत्तात्रेय ढवळे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत शिवकर**
**ता.पनवेल, जि.रायगड**

## बांधकाम साहित्याची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनेक वर्षांपासून बांधकाम सुरू असलेल्या खारघर येथील महापौर निवासाच्या इमारतीच्या कामासाठी मागवलेल्या वीज साहित्याची चोरी झाली आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेत एक लाख रुपयांची केबल व इतर साहित्य चोरण्यात आले आहे. खारघर येथील सेक्टर २१ येथील भूखंड क्रमांक १५१ येथे पनवेल महापालिका महापौर निवास बांधत आहे. या महापौर निवासाचे काम अंतिम टप्प्यात आहे. २८ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान ही चोरी झाल्याची नोंद गरजितसिंग रहलोवालिया यांनी दिली आहे.

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. अनिल जनार्दन नाईक यांनी मुळ मालक श्री. नरेश रामचंद्र तांडेल राहणार म्हातवली, ता. उरण, जि. रायगड, यांना त्यांच्या मालकीची मिळकत १२.५ टक्के योजनेअंतर्गत संपादित करण्यात आलेली असुन सदरहू संपादनापोटी मिळालेला भुखंड आमचे अशिल यांनी सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरित करुन घेणार आहेत. सदरहू भुखंडाचे वर्णन खालील प्रमाणेः-

**नोड द्रोणागिरी, ता. उरण जि. रायगड**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी | ५६ | २०२ | ४० चौ.मी. |

तरी वरिल वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात आम्हांला आमचे खालील पत्यावर समक्ष येऊन भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरिल नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवुन तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्या नंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक : ०७/११/२०२५

**सही/-**
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभात सेंटर, सेक्टर १ए,**
**सीबीडी बेलापुर, नवी मुंबई- ४०० ६१४.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत बामुबाई रामभाऊ म्हात्रे व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास सबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशील ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट : - तुकडी रायगड, पोटतुकडी तालुका पेण, मे. दुय्यम निबंधक पेण, रायगड, जिल्हा. रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील मौजे मसद बुद्रुक, येथील मिळकत खालीलप्रमाणे -

| सर्व्हे क्रमांक | क्षेत्र हे.आर.प्र. | पोटखराबा हे.आर.प्र. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८५ | ०.४१.५० | ०.००.५० | ५.२० |

यांसी चतु:सीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : ८ नोव्हेंबर २०२५.

**सही/-**
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३,**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

# उलवे कोस्टल रोड : नवी मुंबईला कनेक्टिव्हिटीचा नवा अध्याय

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एमटीएचएल) यांसह जेएनपीटी, नवी मुंबई सेझ आणि आम्र मार्ग या प्रादेशिक मार्गिकांदरम्यान कनेक्टिव्हिटी बळकट करण्याकरिता सिडकोतर्फे हाती घेण्यात आलेल्या पायाभूत सुविधा उपक्रमांपैकी उलवे किनारी मार्ग प्रकल्प हा सर्वांत महत्त्वाचा ठरणार आहे.

आजपर्यंत प्रकल्पाची ६०% भौतिक प्रगती झाली असून नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या दिशेने प्रकल्पाची सातत्याने वाटचाल सुरू आहे. अंदाजे सात कि.मी. लांबी असणारा सहा पदरी (३+३) उन्नत उलवे किनारी मार्गाचा ५.८० कि.मी. चा टप्पा हा किनारी मार्ग असून ०.९०३ कि.मी. लांबीचा टप्पा हा जागतिक दर्जाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला थेट जोडणारा एअरपोर्ट लिंक रोड आहे. कार्यान्वित झाल्यानंतर हा आधुनिक द्रुतगती महामार्ग नवी मुंबईला जागतिक व्यापार व



कनेक्टिव्हिटीचे प्रवेशद्वार बनवण्यामधील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

एमएटीएचएल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि आम्र मार्ग यांदरम्यान अखंड व सिग्नलविरहित प्रवास शक्य करण्यासह सध्या अस्तित्वात असलेल्या पाम बीच मार्ग, आम्र मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग ३४८ या मार्गांवरील ताण कमी करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. या सुधारित कनेक्टिव्हिटीमुळे दक्षिण मुंबई आणि नवी मुंबईमधील प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी होणार असून प्रवासी, लॉजिस्टिक्स आणि प्रादेशिक व्यापाराकरिताही हे फायदेशीर ठरणार आहे. रस्त्याच्या मजबुती आणि सुरक्षिततेसाठी प्रकल्पांतर्गत उड्डाण पूल, मोठे पूल, रेल्वे मार्गावरील पूल आणि अन्य महत्त्वाची बांधकामे अंतर्भूत आहेत. प्रीफॅब्रीकेटेड व्हर्टिकल ड्रेन्स (पीव्हीडीज्), दगडी खांब आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प स्थळ येथून प्राप्त करण्यात आलेल्या भराव साहित्याचा वापर, यांचा समावेश असलेल्या ग्राउंड-इम्प्रूव्हमेन्ट तंत्रांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. संपूर्ण मार्गावर उर्जा-कार्यक्षम एलईडी दिवे, अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा, लेन मार्किंग, न्टी-क्रॅश बॅरिअर आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन पायाभूत सुविधा असणार असून ज्याद्वारे प्रवाशांचा सुरक्षित व सुरळीत प्रवास सुनिश्चित होणार आहे.

देशातील सर्वांत महत्त्वाकांक्षी विमानतळ प्रकल्प आणि सर्वाधिक लांबीचा सागरी पूल यांना जोडणारा उलवे किनारी मार्ग हा महत्त्वपूर्ण नागरी प्रकल्प आहे. नवी मुंबईला प्रगतीच्या दिशेने नेणाऱ्या शाश्वत अभियांत्रिकी आणि दूरदृष्टीचे नागरी नियोजन याचे हा प्रकल्प उत्तम उदाहरण आहे.

> सध्या अस्तित्वात असलेल्या मुख्य रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासह या प्रदेशाच्या एकंदर आर्थिक विकासाकरिता हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. पूर्णत्वास गेल्यानंतर उलवे किनारी मार्ग हा नवी मुंबईतील परिवहन सक्षम करणारा व देशाच्या आर्थिक विकासास गती देणारा ऐतिहासिक पायाभूत सुविधा प्रकल्प ठरणार आहे.
>
> **विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# सार्वजनिक बांधकाम विभागात सावळागोंधळ ; निविदा प्रक्रियापूर्वीच ठेका

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सार्वजनिक बांधकाम विभागातील कामकाज गतिमान आणि पारदर्शक व्हावे, म्हणून ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. मात्र, याच प्रक्रियेत सावळागोंधळ असल्याचे समोर आले आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील विद्युत कामाची निविदा पूर्ण झाली नसताना ठेकेदारांकडून काम केले जात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रियेबाबत संशय व्यक्त केला जात आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसताना ठेकेदाराने काम सुरु केल्याचा आरोप होत आहे. या भोंगळ कारभाराबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

रायगड जिल्ह्यात विशेष म्हणजे अलिबाग तालुक्यात वेगवेगळी कामे करताना कोणत्याही प्रकारची प्रक्रिया पूर्ण न करता केली जात असल्याचा प्रकार घडत आहे. चौलनंतर अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयातील कारभाराबाबतची माहिती समोर आली आहे. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयासह ग्रामीण रुग्णालयात विद्युत विभागामार्फत काम केले जाणार आहेत. रोहित्राबरोबरच केबल टाकण्याचे काम या ठिकाणी केले जाणार आहे. तसेच जिल्हा रुग्णालयातील शल्यचिकित्सक यांच्या कार्यालयात तसेच परिसरात पथदिवे, इन्व्हर्टर लावण्याचे काम अलिबागसह मुरूड याठिकाणीदेखील केले जाणार आहे. या कामांसाठी तीस लाख रुपयांहून अधिक निविदा काढण्यात आली आहे. पेण येथील



सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागातील कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत. निविदा स्वीकारण्याच्या आणि नाकारण्याचे अधिकारी कार्यकारी अभियंता यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

दि. ३१ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.त्यानंतर ११ नोव्हेंबरला निविदा उघडली जाणार आहे. मात्र, या निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याअगोदरच एका ठेकेदारामार्फत कामाला सुरुवात करण्यात आली आहे. ही विद्युत कामे गेल्या काही दिवसांपासून सुरू केल्याची माहिती समोर आली आहे.

निविदा प्रक्रिया ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता पूर्ण होणार आहे. तरीदेखील नियमांचे उल्लंघन करीत ठेकेदाराकडून त्याचे काम सुरू केले आहे. त्यामुळे या निविदा प्रक्रियेच्या कामाबाबत संशय व्यक्त केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा विद्युत विभाग ठेकेदारावर मेहेरबान का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# दि.११ नोव्हेंबर रोजी बोर्ली येथे रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्ध पादुकांचा दर्शन सोहळा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

अनंत श्रीविभुषित जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी व पिठाचे उत्तराधिकारी परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने मंगळवार दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०-०० वाजता दक्षिणपीठ नाणीजधामच्या वतीने मुरुड तालुक्यातील बोर्ली येथील अमित वेसावकर यांच्या मैदानावर सिद्ध पादुका दर्शन सोहळा संपन्न होत असून सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे.

या सोहळ्यामध्ये गुरुपूजनासह सामाजिक उपक्रमांतर्गत रामानंद संप्रदायातर्फे गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटप करण्यात येणार आहे.

यादिवशी सर्वप्रथम बोर्लीतील यजमान जितेंद्र पाटील यांच्या निवासस्थानापासून श्रींच्या पादुका वाजत गाजत कार्यक्रम स्थळी येताना मुख्य बॅनर, बाईकरॅली, ढोलपथक,कलशधारी महिला,निशाणधारी पुरुष, रामपंचतन देखावा,विविध देखावे,कोळीनृत्य, भजनपथक,माऊलींचा रथ,हरिपाठ नृत्य,खालुबाजा, लेझीमपथक व शेवटी भक्तगण अशी पथके खास आकर्षण असणार आहेत.

कार्यक्रमस्थळी सर्वप्रथम श्रींच्या पादुकांचे आगमन झाल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सामाजिक दुर्बल घटक उपक्रमांतर्गत गरजू शालेय विद्यार्थ्यांना मोफत सायकल वाटपकरण्यात येणार आहे .

त्यानंतर गुरुपूजन व श्रींची आरती होईल, तदनंतर ज.न.म. प्रवचनकार शोभा बेलदार यांचे सुश्राव्य सुमधूर बहारदार प्रवचन होईल. त्यानंतर उपासक दिक्षा,सिद्ध पादुका दर्शन व नंतर पुष्पवृष्टीने कार्यक्रमाची सांगता होईल.

तरी सर्व रायगड जिल्ह्यातील भक्तगणांनी या शानदार सोहळ्याला उपस्थित राहून गुरुसेवेचं व रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिध्द पादुकांच्या दर्शनाचा व गुरु पूजनाचा लाभ घेऊन पुण्य पदरी पाडून घ्यावे.असे आवाहन रामानंद संप्रदाय (जिल्हा दक्षिण रायगड) यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# माणगांवचा सुपुत्र अजिंक्य काप हाफ आयर्नमॅन फिनिशर!




**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव (जि. रायगड) येथील तरुण खेळाडू अजिंक्य बाळकृष्ण काप यांनी आयर्नमॅन ७०.३ लंगकावी, मलेशिया दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या आशियातील सर्वात कठीण ट्रायथलॉन स्पर्धांपैकी एक स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करत अभिमानास्पद कामगिरी केली आहे. माणगांव मधिल सुपरिचीत शिक्षिका तथा निवेदिका (अँकर) काप मॅडम व कृषी अधिकारी बाळकृष्ण काप यांचा सुपुत्र अजिंक्य याने सद्यस्थितीत पुणे येथे जॉब सांभाळून मिळविलेल्या या यशाचे सर्वत्र तोंडभरून कौतुक होत आहे.

ही स्पर्धा एन्ड्युरन्स कॉर्नर या पुण्यातील प्रतिष्ठित एन्ड्युरन्स प्रशिक्षण संस्थेच्या संघामार्फत खेळली गेली. तापमान तब्बल ३८ अंश सेल्सिअस आणि ८८ टक्के आर्द्रता असताना सर्व सदस्यांनी शर्यत यशस्वीरित्या पूर्ण केली. हा भारतीय एन्ड्युरन्स क्रीडेसाठी अभिमानाचा क्षण ठरला.

अजिंक्य काप यांनी पहिल्याच प्रयत्नात हाफ आयर्नमॅन फिनिशर म्हणून ७ तास ३ मिनिटे ५४ सेकंदात स्पर्धा पूर्ण केली. त्यांचा पराक्रम पुढीलप्रमाणे - स्विमिंग (१.९ किमी) : ४७ मिनिटे १२ सेकंद, सायकलिंग (९० किमी) : ३ तास २२ मिनिटे ३५ सेकंद, रनिंग (२१.१ किमी) : २ तास ४१ मिनिटे ५४ सेकंद अजिंक्यच्या पराक्रमामुळे माणगांव व रायगड जिल्ह्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे.

संघातील अन्य स्पर्धकांमध्ये बद्रीनाथ शास्त्री, विक्रम घोडके, प्रशांत घालके यांचा समावेश होता. सर्वांनी तीव्र उष्णतेचा मुकाबला करत चिकाटी आणि संघभावनेचे दर्शन घडवले. संघाचे प्रमुख प्रशिक्षक कोच रोहन कुंभार यांनी आपल्या तिसऱ्या फुल आयर्नमॅन स्पर्धेत १४ तास ५० मिनिटे १४ सेकंदात यशस्वी फिनिश करत नेतृत्व सिद्ध केले. त्यांनी सांगितले - लंगकावीने आमच्या तयारीची प्रत्येक बाजू तपासली - शारीरिक, मानसिक आणि भावनिक. एवढ्या तीव्र उष्णतेत माझ्या ट्रेनीजनी स्पर्धा पूर्ण केली, हेच खरे यश आहे. आम्ही पुढील स्पर्धांसाठी आणखी तयारी करू.

स्पर्धेनंतर संघाने लंगकावीच्या सुंदर समुद्र किनारी घेतलेला फोटो हा केवळ पदकांचा नव्हता तर तो संघभावना, सातत्य, मेहनतीचे प्रतीक होता. ट्रेन - रेस्ट - रिपीट हा संघाचा प्रेरणामंत्र ठरला. एन्ड्युरन्स कॉर्नर संस्था भारतातील खेळाडूंना आयर्नमॅन, मॅरेथॉन आणि अल्ट्रा एन्ड्युरन्स स्पर्धांसाठी वैज्ञानिक आणि संरचित प्रशिक्षण देते. लंगकावी आयर्नमॅन २०२५ ही स्पर्धा त्यांच्या प्रवासातील आणखी एक अभिमानास्पद नोंद ठरली.

**परिशिष्ट-५**

**(सोडत व आरक्षण प्रसिद्धी जाहीर सूचनेचा नमुना-मराठी)**

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५

### आरक्षण सोडत कार्यक्रम

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनूसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिलासांठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणांचे प्रारूप प्रसिद्ध करून हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | आरक्षण सोडत दिनांक | मंगळवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ सकाळी ११.०० वा.<br>स्थळ आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह,<br>पनवेल महानगरपालिका |
| २ | आरक्षणाचे प्रारूप प्रसिद्ध करण्याचा दिनांक | सोमवार<br>दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ |
| ३ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ ते<br>सोमवार, २४ नोव्हेंबर, २०२५<br>(दुपारी ३.०० वाजेपर्यंत) |
| ४ | हरकती व सूचना दाखल करण्याचे ठिकाण | पनवेल महानगरपालिका मुख्यालय (नागरी सुविधा केंद्र)<br>अथवा संबंधित प्रभाग कार्यालय येथे सादर कराव्यात. |

टिप:- दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०८/११/२०२५

**सही/-**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

**परिशिष्ट-६**

**(सोडत व आरक्षण प्रसिद्धी जाहीर सूचनेचा नमुना-इंग्रजी)**

## PANVEL MUNCIPAL CORPORATION

GENERAL ELECTION 2025

PROGRAMME FOR THE DRAW OF LOTS FOR RESERVATION

### PUBLIC NOTICE

For the General Election of Panvel Municipal Corporation to be held in the year 2025 The Programme for the Draw of lots for reservation of seats in the category of the Scheduled Caste (women), Scheduled Tribes (women), Backward Class of Citizens, backward Class of Citizens (women) & Women from General Category and for the publication of reservation is as below.

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of the Draw for the reservation | Tuesday, Date 11 November, 2025 At 11.00 a.m Place Adya Krantiveer Vasudev Balwant Phadke Auditorium |
| 2 | Date of publishing the draft of reservation | Monday, Date 17 November, 2025 |
| 3 | Last date of submitting Objections & Suggestions | Monday, Date Monday, Date 17/11/2025 To 24/11/2025 |
| 4 | Place where Objections & Suggestions are to be filed | Panvel Muncipal Head (Citizen Facility Center concerned ward Office office ), or |

Note: After considering all Objections & Suggestions, final notification of reservation will be published.

Place :- Panvel
Date: 08/11/2025

**SD/-**
**Commissioner**
**PANVEL MUNCIPAL CORPORATION**